सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२५/ 61
दिनांक 02 JAN 2026

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,अमरावती/यवतमाळ
शासकीय तंत्रनिकेतन,अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशिम/मुर्तिजापूर/अचलपूर

**विषय : मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत. (डिजिटल स्मार्ट रीडिंग झोनबाबत.)**

**संदर्भ :** मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.DTEM-D१७०TEQP/२०२५-DESK१७ दिनांक २२ डिसेंबर २०२५

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांच्या अक्ष्यक्षतेखाली दिनांक ०८.१२.२०२५ रोजी नागपूर येथील विधानभवनात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या समवेत संचालनालयातील विविध विषयांच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडलेले आहे. सदर इतिवृत्तामध्ये दिलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

सदर बैठकीमध्ये डिजीटल रीडिंग झोन ही एक आधुनिक डिजिटल लायब्ररी असून, यामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके,संदर्भ साहित्य,शैक्षणिक व संशोधन सामग्री डिजिटल स्वरुपात (ई-लायब्ररी/ई-रीडिंग सिस्टीम) उपलब्ध करुन दिली जाते. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना जलद, सुलभ व दर्जेदार ज्ञान प्राप्त होते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,चंद्रपूर येथे सदर उपक्रमाचा शुभारंभ मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांच्या हस्ते दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना आधुनिक डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे हा याचा मुख्य उद्देश आहे.

सदर उपक्रम यशस्वी ठरल्याने, अशाच प्रकारचे डिजिटल स्मार्ट रीडिंग झोन इतर संस्थांमध्येही उभारण्याचे नियोजन करण्यात येत असून, याबाबत मा.मंत्री महोदयांचे निर्देश आहेत. या अनुषंगाने आपल्या संस्थेमध्ये सदर उपक्रमाची अंमलबजावणी CSR किंवा अर्थसंकल्पीत तरतूदीमधून करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**(डॉ.वि.रं.मानकर)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४९/४६६/४१९
ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : DTEM-D170TEQP/212/2025-DESK17 दिनांक : २२ डिसेंबर, २०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर

**विषय: मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत — डिजीटल स्मार्ट रीडिंग झोन बाबत..**

**संदर्भ:** शासन पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.७७२/तांशि-४, दिनांक १९/१२/२०२५.

मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपूर येथील विधानभवनात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या समवेत संचालनालयातील विविध विषयांच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्ततील खालील मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

| अ.क्र | इतिवत्तातील मुद्या क्रमांक | विषय | मा. मंत्री महोदय यांचे निर्देश |
|---|---|---|---|
| १ | ८ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथे तयार करण्यात आलेल्या डिजीटल स्मार्ट रिडींग झोन प्रमाणे इतर अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनांमध्ये हा प्रकल्प राबविणेबाबत. | शासकीय अभि. महा. चद्रपुर येथे तयार करण्यात आलेल्या डिजीटल स्मार्ट रिडींग झोन विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयुक्त असून इतर अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनांमध्ये हा उपक्रम राबविण्याचे निर्देश आहेत. |

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने येथे नमूद करण्यात येते की, मा.अपर मुख्य सचिव यांनी दि. 11 नोव्हेंबर 2025 च्या भेटी दरम्यान शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर च्या प्राचार्यांना आणि इतर अध्यापकांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला संकुल परिसरात निशुल्क स्वरूपात त्यांच्या मोबाईल अथवा लॅपटॉपद्वारे ग्रंथालयाशी निगडित सॉफ्टवेअरच्या माध्यमातून आवश्यक नियतकालिके, वृत्तपत्रे व जर्नल्स कुठेही व कधीही वाचन व अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्याबाबत सूचना दिल्या. त्यानुसार प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर, यांनी या उपक्रमासाठी आवश्यक निधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे सादर करून CSR च्या माध्यमातून निधी मंजूर करून घेतला. महाविद्यालयातील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या समितीने सविस्तर अभ्यास करून MAGZTER या कंपनीच्या 'डिजिटल स्मार्ट रीडिंग झोन' ची निवड केली. सदर डिजिटल स्मार्ट रीडिंग झोनसाठी विहित प्रक्रिया राबवून सुविधा प्राप्त करून घेतली आहे.

डिजीटल स्मार्ट रीडिंग झोन ही एक आधुनिक डिजिटल लायब्ररी असून, यामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके, संदर्भ साहित्य, शैक्षणिक व संशोधन सामग्री डिजिटल स्वरूपात (ई-लायब्ररी/ई-रीडिंग सिस्टीम) उपलब्ध करून दिली जाते. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना जलद, सुलभ व दर्जेदार ज्ञान प्राप्त होते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर येथे सदर उपक्रमाचा शुभारंभ मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांच्या हस्ते दिनांक 03 डिसेंबर 2025 रोजी करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना आधुनिक डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हा याचा मुख्य उद्देश आहे.

हा उपक्रम यशस्वी ठरल्याने, अशाच प्रकारचे 'डिजिटल स्मार्ट रीडिंग झोन' इतर संस्थांमध्येही उभारण्याचे नियोजन करण्यात येत असून, याबाबत मा. मंत्री महोदयांचे निर्देश आहेत. या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांना सदर उपक्रमाच्या अंमलबजावणी CSR किंवा अर्थसंकल्पीत तरतूदीमधून करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत :- माहितीसाठी.**
मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.